BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

भारताची हरित अर्थव्यवस्था, हवामान बदल आणि शाश्वत विकास

भालेराव सुधाकर नारायण

Email ID-sbhalerao410@gmail

ABSTRACT

वाढते शहरीकरण आणि लोकसंख्यावाढ यामुळे जागतिक स्तरावर पर्यावरणीय समस्या गंभीर बनत चालल्या आहेत. हवामान बदल, जागतिक तापमान वाढ, नैसर्गिक संसाधनाचा अतीवापर, प्रदूषण आणि जैवविविधतेचा ऱ्हास ही प्रमुख आव्हाने आहेत. ही आव्हाने कमी करून मानव जातीच्या जीवन स्तरात सुधारणा करणे हे प्रमुख लक्ष्य राहिले आहे. व्यवस्था आय शाश्वत विकासाचा अभ्यास हा विकासाच्या अभ्यासात महत्त्वाचा आहे आणि संशोधनाच्या अभ्यासात त्याचे महत्त्व आहे. समाजाच्या सर्व पैलूंमध्ये विकास करणे तो शाश्वत विकासाचा केंद्रबिंदू आहे. विकास आणि समृद्धी साठी त्याचा मुख्य आधारस्तंभ आहे. हरित अर्थव्यवस्था

हे शाश्वत विकासांचे ज्वलंत आणि आदर्श मॉडेल मानले जाते. विशेषत: आर्थिक विकास, जो जीवनाच्या सर्व पैलूवर परिणाम करतो. अलिकडच्या वर्षात दारिद्र्य आणि निराधारपणाचे प्रकटीकरण कमी करणे आणि लोकसंख्येचे जीवनमान उंचावणे आणि त्यांचे कल्याण सुनिश्चित करणे याच्या महत्वामुळे त्याची संकल्पना उदयास आली हे लक्षात घेण्यासारखे आहे की, शाश्वत विकासाची भूमिका केवळ हरित अर्थव्यवस्था कार्यक्रम राबवून आणि निरोगी वातावरण प्रदान करुन सक्रिय केली जाऊ शकते. शाश्वत विकासाच्या संकल्पनेसाठी, भौतिक आणि मानवी शक्तीचे शोषण, समकर्थन आणि रोजगार इष्टतम रीतीने करणे आणि त्यांचा विकास करणे आणि त्याची प्रभावीता वाढवणे अशा प्रकारे कार्य करणे जे वर्तमान आणि भविष्यातील प्रत्येकाच्या हक्कांची हमी देते आणि त्यात लोक आणि नैसर्गिक संसाधने यांचा समावेश होतो. त्यांचे योग्य नियोजन करणे काळाची गरज आहे.

प्रस्तावना:-

21 व्या शतकात हरित आर्थिक विकास म्हणजेच देशाच्या प्रगतीचे प्रमुख परिमाण मानले जाते. औद्योगिकीकरण, नागरीकरण, तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणामुळे उत्पादन व व्यापारात अभूतपूर्व वाढ झाली आहे. परंतु या विकासामुळे पृथ्वीच्या नैसर्गिक संसाधनावर मोठा परिणाम होत चालला आहे. हवा, पाणी, माती यांचे प्रदुषण वाढले आहे. वनसंपदा, जैवविविधता व परिसंस्था नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे हवामान बदल, उष्णता वाढ, पूर, दुष्काळ, चक्रीवादळे, पिकांचे नुकसान, मानवी आरोग्याच्या समस्या अशा संकटांचा सामना मानवाला करावा लागत आहे. वर्तमान काळात हरित अर्थव्यवस्था हा महत्त्वाचा विषय आहे. हरित अर्थव्यवस्था ही अशी यंत्रणा आहे ज्याचा परिणाम प्रामुख्याने मानवी कल्याण आणि पर्यावरणीय जोखीम करण्यात सुधारणा आणि विकास होतो. पर्यावरणाच्या अनुषंगाने प्रदूषण कमी करून हवामान सुधारते. रोजगार आणि गुंतवणूकीच्या संधी उपलब्ध करून देण्यात त्यांची भूमिका महत्वाची आहे. संकटावर मात करण्यासाठी राष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी हे एक दीर्घकालीन धोरण आहे. कारण हरित अर्थव्यवस्था सर्वांसाठी योग्य रोजगार संधी उपलध करून देण्याचा प्रयत्न करते. हरित अर्थव्यवस्थेसाठी कार्यक्षम आणि कुशल कामगार आणि व्यावसायिकांची आवश्यकता असते.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

हरित अर्थव्यवस्थेच्या सर्वात महत्त्वाच्या उद्दिष्टांपैकी एक म्हणजे हरित अर्थव्यवस्थेत अडथळा आणणारी किंवा साध्य करणारी धोरणे आणि नियमांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. शाश्वत भौतिक आणि मानवी विकास साधण्यासाठी हरित अर्थव्यवस्था साध्य करण्यासाठी बहुतांश कंपन्यांच्या संरचनेत आणि धोरणामध्ये मूलभूत बदल करणे आवश्यक आहे. जगातील भांडवलशाही राष्ट्रांनी औद्योगिक क्रांती घडवून आणली. त्यात इंग्लंड हे पहिले राष्ट्र ठरले. पुढे युरोपियन देशांनी ते आत्मसात करण्याचा सफल प्रयत्न केला. विकासाच्या चढाओढीत निर्माण झालेल्या औद्योगिकीकरणातून हवामान बदलाचा प्रश्न निर्माण झाला. जेवढा एखाद्या राष्ट्राचा अधिक विकास तेवढेच भांडवल निर्मिती व औद्योगिकीकरण वाढत गेले. मात्र हवामान बदलाच्या समस्येकडे दुर्लक्ष झाले. वर्तमान काळात विकसीत व विकसनशील अशा दोन्ही अर्थव्यवस्थांमध्ये प्रदुषण व पर्यावरणीय संतुलनाचा प्रश्न निर्माण झाला. मानवाच्या विकासाबरोबरच पर्यावरणीय संतुलन साधण्याची गरज जगाला जाणवू लागली. तसेच औद्योगिकरणामुळे नैसर्गिक साधन सामुग्रीचा अपव्यय होऊ लागला. भविष्यातील पिढीला पुरेल इतकी नैसर्गिक साधन सामुग्री शिल्लक ठेवणे गरजेचे आहे. आपण सुखाने जगलो पाहिजे परंतु आपल्या नंतरच्या पिढीसाठी नैसर्गिक साधन सामुग्री शिल्लक ठेवली पाहिजे व त्याकरीता नैसर्गिक साधनसामुग्रीचा योग्य वापर केला पाहिजे हाच विचार म्हणजे शाश्वत, टिकाऊ व निरंतर विकासाचा ज्वलंत प्रश्न जगासमोर निर्माण झाला आहे.

प्रस्तुत संशोधन पेपरमधून हरित अर्थव्यवस्थेची संकल्पना, तिचे महत्त्व, उद्दिष्टये आणि पातळी, सर्वात महत्वाच्या हरित नोकऱ्या, हरित अर्थव्यवस्थेकडे जाण्याची गरज आणि तीची उपलब्धता, अडथळे तसेच शाश्वत विकासावर हरित अर्थव्यवस्थेच्या प्रभावाचे संकेत यासह महत्वाच्या पैलूंवर प्रस्तुत संशोधन पेपर मधून प्रकाश टाकला आहे.

मुख्य शब्द (key Words) – पर्यावरण, प्रदुषण, गरिबी, विकास गुंतवणूक अर्थव्यवस्था ऊर्जा, हरित अर्थव्यवस्थेचा अभ्यास आणि त्याचा शाश्वत विकासावर होणारा परिणाम.

*** शोधनिबंधाची उद्दिष्टये:-**

1) अर्थव्यवस्था संकल्पना समजावून घेणे.
2) भारतातील शाश्वत विकासाशी संबंधित सरकारी धोरणांचा अभ्यास करणे.
3) औद्योगिकरणाच्या मोठया चढाओढीमुळे हवामान बदलाच्या निर्माण झालेल्या प्रश्नांचा अभ्यास करणे.
4) पर्यावरण संरक्षण व आर्थिक विकास यातील समन्वयाचा अभ्यास करणे.

शोधनिबंधाची गृहितके:-

1) ‘ जगा आणि जगु द्या’ ही भूमिका महत्त्वाची असून वर्तमान पिढीला शिकण्याची गरज आहे.
2) विकासाच्या चढाओढीतून पर्यावरणीय संतुलनाचा प्रश्न निर्माण झाला आहे.
3) शाश्वत विकासामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेत बदल होत आहे.
4) हरित अर्थव्यवस्था आणि शाश्वत विकास करण्यात जनतेची भूमिका महत्वाची आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

*** संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत संशोधन पेपरसाठी वर्णनात्मक, संशोधन पद्धती वापरण्यात आली आहे. हा संशोधन पेपर व्दितीय सामुग्रीवर आधारित आहे. तथ्यांचे सकलन संकलन करताना संदर्भग्रंथ, वृत्तमानपत्रे, मासिके, त्रैमासिके, प्रकाशित व अप्रकाशित अहवाल, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे.

*** हरित अर्थव्यवस्था संकल्पना:-**

अर्थव्यवस्था म्हणजे पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करून आर्थिक विकास साधणे. यामध्ये कार्बन उत्सर्जन कमी करणे, स्वच्छ ऊर्जा वापरणे आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन यांचा समावेश होतो. हरित अर्थव्यवस्थेचा उद्देश अर्थव्यवस्थेला पर्यावरण पुरक बनवणे हा आहे. सोप्या भाषेत, ही एक अशी अर्थव्यवस्था आहे ज्यामध्ये कमी कार्बन उत्सर्जन निर्माण करण्यावर आणि सर्व सामाजिक गटांना संसाधनात्मक पणे सामावून घेण्यावर भर देण्यात येतो. संसाधने आणि ऊर्जा वापराची कार्यक्षमता वाढवून प्रखर आणि कार्बन उत्सर्जन कमी करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. सार्वजनिक आणि खाजगी गुंतवणूकीव्दारे चालवल्या जाणाऱ्या उत्पन्न आणि नोकरीच्या संधीमध्ये वाढ करण्याची देखील हरित अर्थव्यवस्था आकांक्षा बाळगते.

या गुंतवणुकीला करावा लागणारा खर्च, धोरणात्मक सुधारणा आणि बदलत्या नियमाव्दारे प्रोत्साहन आणि समर्थन मिळणे आवश्यक आहे. विकासाच्या मार्गाने नैसर्गिक भांडवलाचे जतन आणि सुधारणा करणे आवश्यक आहे. पर्यावरणीय धोके आणि संसाधनांची कमतरता लक्षणीयरीत्या कमी करणे हे हरित अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट आहे. हरित अर्थव्यवस्था ही पर्यावरणीय अर्थशास्त्राच्या ज्ञानावर आधारित आहे जी आर्थिक प्रणाली नैसर्गिक प्रणालींच्या गटातील परस्परावलंबनासह संतुलित आहे. स्वच्छ तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणे हे हरित अर्थव्यवस्थेचे धोरण आहे.

*** हरित अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्ये**

1) प्रदुषण कमी करून, नवीकरणीय ऊर्जा वापरणे.
2) लोककेंद्रित विकासावर जास्त भर देवून केवळ उत्पादन नव्हे तर लोकांचे आरोग्य, शिक्षण, रोजगार महत्त्वाचा आहे.
3) वन्यजीव वनस्पती परिसंस्था यांचे रक्षण करणे.
4) पाणी, वीज, खनिजे यांचा अपव्यय टाळणे

*** शाखत विकास संकल्पना:-**

शाश्वत विकास म्हणजे भविष्यातील पिढयांच्या गरजा भागवण्याच्या क्षमतेला धक्का न लावता, वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करणारा विकास होय. भावी पिढीच्या उपभोगावर परिणाम होणार नाही. परंतू असे होताना दिसत नाही. जीवन साखळी कोलमडत चालली आहे. हवा प्रदुषित , पाणी प्रदुषित, जंगलतोड, वाळूसाठा संपत चालला आहे. भावी पिढी तर दुरच, चालु पिढीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होत आहे.

शाश्वत विकासातील तीन प्रमुख आधारस्तंभ:

1) **पर्यावरणीय शाश्वतता:-** नैसर्गिक संसाधनांचा संतुलित वापर, प्रदुषण व हवामान बदलीवर नियंत्रण ठेवणे.
2) **सामाजिक शाश्वतता:-** सर्वांना न्याय, संधी, समानता, आरोग्य, शिक्षण उपलब्ध करून देणे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

3) **आर्थिक शाश्वतता:-** शेती, उद्योग, व्यापार सातत्याने टिकून राहतील असा विकास करणे.

*** ऐतिहासिक पार्श्वभूमी:-**

हरित अर्थव्यवस्थेची पाळेमुळे प्राचीन विचारांमध्ये पहायला मिळतात. जसे. ऋग्वेद, उपनिषद, बौध्द व जैन धर्मग्रंथात निसर्गाशी संतुलन राखा असे सांगितले. महात्मा गांधी यांनी पृथ्वी प्रत्येकाच्या गरजा भावगत असते. पण प्रत्येकाच्या लाभाला नाही असे सांगून शाश्वतेचे तत्व मांडले आहे. 1972 च्या स्टॉकहोम परिषदेत आणि 1992 च्या रिओ-डी-जोनेरी च्या रिओ-डी- जोनेरी येथील पृथ्वी शिखर परिषदेमध्ये जागतिक पातळीवर पर्यावरण व विकासाबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली होती.

*** भारतातील हरित अर्थव्यवस्था संदर्भात शासकीय धोरणे:-**

1) राष्ट्रीय कृती आराखडा तयार करणे:- हवामान बदल, हवामान बदलाचे दुष्परिणाम कमी करण्या साठी भारत सरकारन NAPCC अंतर्गत अनेक कार्यक्रम राबविले आहेत.

2) मिशन LIFE (Life Style for Environment):- पर्यावरणपुरक जीवनशैली स्वीकारण्यासाठी नागरिकांचा सहभाग वाढविणे हे या मिशनचे प्रमुख ध्येय आहे.

3) नवीकरणीय ऊर्जा धोरण :- भारत सरकारने सौर ऊर्जा, पवन, जल व जैवऊर्जेवर भर दिला आहे. 2030 पर्यंत मोठ्या प्रमाणात नवीकरणीय ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

4) स्ववच्छ भारत अभियान:- स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी हे महत्त्वपूर्ण आहे.

*** भारत सरकारने राबविलेली धोरणे :-**

1) राष्ट्रीय हवामान बदल कृती आराखडा:- सौर ऊर्जा, ऊर्जा कार्यक्षमतेत सुधारणा, शाश्वत शेती, पाणी संवर्धन

2) राष्ट्रीय हरित अधिकरण: - पर्यावरणीय न्याय व संरक्षणासाठी स्वतंत्र न्यायालयीन संस्था

3) स्वच्छ भारत अभियान:- स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, शौचालय निर्मिती

4) उज्वला योजना:- ग्रामीण महिलांना स्वच्छ इंधन उपलब्ध करून देणे ज्यामूळे झाडे तोडणे, धुर कमी होतो. **5) आंतरराष्ट्रीय सौर ऊर्जा:-** भारताच्या पुढाकाराने 100 हुन अधिक देशांच्या सौरऊर्जासाठी जागतिक मंच तयार करणे.

6) जल जीवन मिशन:- प्रत्येक घराला स्वच्छ पाणी पुरवठा करणे.

7) राष्ट्रीय इलेक्ट्रिक वाहन धोरण:- वाढते प्रदुषण टाळण्यासाठी ई-वाहनांना प्रोत्साहन देणे.

*** हरित व शाश्वत विकासातील आव्हाने:-**

1) वाढती लोकसंख्या:-

भारत जगामध्ये लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर असलेला देश आहे. वाढती लोकसंख्या म्हणजे अन्न, पाणी, ऊर्जा व निवास याची सतत वाढत चाललेली मागणी.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

2) सामाजिक व राजकीय अडथळे:-

लोकांच्या जीवनशैलीत झालेला बदल आणि त्या जीवनशैलीत बदल घडविणे अवघड असते. तसेच तयार करण्यात आलेल्या घोरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात नाही.

3) वाढते औद्योगिकीकरण व नागरीकरण:-

औद्योगिक उत्पादन आणि आणि वाढता शहरांचा विस्तार यामुळे कचरा व्यवस्थापन, वाहनाचा गर्दी, उष्णता बेटे यासारख्या समस्या निर्माण होत असतात.

4) तंत्रज्ञान व निधीची कमतरता:-

स्वच्छ ऊर्जा पुनर्वापर तंत्रज्ञान, ई-वाहन निर्मिती यासाठी मोठ्या गुंतवणुकीची गरज आहे जी विकसनशील देशांसाठी कठीण आहे.

*** भारतासमोरील प्रमुख पर्यावरणीय समस्या:-**

1) कचरा व्यवस्थापन:- प्लास्टीक व इलेक्ट्रॉनिक कचरा ही मोठी समस्या आहे

2) हवामान बदल:- अनियमित पडणारा पाऊस, दुष्काळ, पुरामुळे शेतीचे नुकसान.

3) हवेचे प्रदूषण:- जागतिक स्तरावर भारतातील अनेक शहरे प्रदुषणात अव्वल आहेत.

4) पाण्याचे प्रदुषण:- अनेक नदया व भूजल दुषित होत चाललेले आहे.

5) वनतोड:- रस्ते, खाणी व औद्योगिक प्रकल्पांमुळे जंगल कमी होत आहे.

*** हरित आणि शाश्वत विकासातील नवीन संधी**

1) नवीकरणीय ऊर्जा:-

भारतात सौरऊर्जा, पवन ऊर्जा, जल ऊर्जा, व बायोमास हे जास्त प्रमाणात आहेत. यामुळे ऊर्जा कमी प्रमाणात आयात करावी लागेल. तसेच रोजगाराच्या नवीन नवीन संधी निर्माण होतील.

आंतरराष्ट्रीय सहकार्य:-

हवामान बदलावर नियंत्रणासाठी भारताला आर्थिक व तांत्रिक मदत मिळेल. यामूळे संशोधन व नवकल्पनांना चालना मिळत जाईल.

3) शाश्वत शहरे:-

वाहतुकीतील प्रदूषण कमी करण्यासाठी मेट्रो, ई-बस, सायकल मार्ग, स्मार्ट ग्रिड्स यांचा वापर केल्याने प्रदुषण कमी होऊन जीवनमान सुधारण्यास मदत होईल.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

4) शाश्वत शेतीला प्राधान्य:-

सेंद्रीय शेती, पाण्याचे कार्यक्षम व्यवस्थापन, ड्रिप सिंचन यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न व पिकांची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल.

5) हरित उदयोग व रोजगार:

चांगले तंत्रज्ञान, कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे यामुळे नवीन उद्योग व व्यवसाय उभे राहतील.

*** भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम**

1) ग्रामीण विकास:-

हरित ऊर्जा (सौर दिवे, बायोगॅस) पाणी संवर्धन, वृक्ष लागवड यामुळे ग्रामीण भागात शाश्वत विकास करण्यास मदत होईल.

2) रोजगार निर्मिती:-

नवीकरणीय ऊर्जा, पुनर्वापर, ई-वाहने, जैविक शेती यांसारख्या क्षेत्रात नवीन रोजगार संधी निर्माण होतील.

3) पर्यावरणासाठी उपयुक्त:-

यामुळे प्रदुषण कमी होईल, आरोग्य सुधारेल, जैवविविधता व परिसंस्था सुरक्षित राहतील

4) शेती:-

शाश्वत शेतीमुळे उत्पादन खर्च कमी होईल.पिकांची गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल. तसेच शेतकऱ्यांचे आरोग्य सुरक्षित राहण्यास मदत होईल.

5) GDP मध्ये बदल:-

हरित व शाश्वत विकासाचा अवलंब केला तर GDP मध्ये फक्त उत्पादन नाही तर पर्यावरणीय व सामाजिक घटक समावण्यास मदत होईल. तसेच आर्थिक नियोजन अधिक सर्वसमावेशक होईल.

*** शिफारशी**

1) प्रभावी शाश्वत विकास धोरणांची अमलबजावणी:-

केंद्र व राज्य शासनांनी पर्यावरणपूरक धोरणांना प्राधान्य दयावे. प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर कठोर कारवाई करण्यात यावी. हवामान बदलावर नियंत्रणासाठी भारताने विकसित देशांसोबत अधिक तांत्रिक व आर्थिक सहकार्य करणे आवश्यक आहे.

2) संशोधन व तंत्रज्ञान:-

हरित तंत्रज्ञान, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे, जलसंवर्धन या विषयात संशोधन वाढविले जावे. तसेच उद्योगांना पर्वावरणपुरक तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

3) सर्वसमावेशक विकास:-

हरित व शाश्वत विकासात गरीब शेतकरी, महिला व दुर्बल घटकांचा विकास करून त्यांचे जीवनमान उंचावणे गरजेचे आहे.

4) शिक्षण व जनजागृती:-

शाळा व महाविद्यालय स्तरावर पर्यावरण व शाश्वत विकास अभ्यासक्रम अनिवार्य केला जावा. तसेच लोकांच्या जीवनशैलीत बदल घडविण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जावेत.

5) नवीकरणीय ऊर्जला प्रोत्साहन द्यावे:-

सौर व पवन ऊर्जेचे प्रकल्प ग्रामीण भागात वाढविणे.

6) शाश्वत शेतीला प्राधान्य:-

सेंद्रीय व नैसर्गिक शेतीला अधिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली पाहिजे.

निष्कर्ष:-

हरित अर्थव्यवरथेची संकल्पना अलीकडील काळात उदयास आली आहे. आणि बहुतेक क्षेत्रातील संशोधन कामाध्ये तीला खुप महत्त्व प्राप्त झाले आहे. हरित अर्थव्यवस्थेची संकल्पना मानवाचे जीवनमान सुधारणे आणि समृद्धी प्राप्त करणे आणि त्यांच्या विविध स्वरूपात शाश्वत विकास साध्य करणे या भोवती फिरते. हरित अर्थव्यवस्था प्रदुषण कमी करण्यास प्रोत्साहीत करते. ज्यामुळे मानवी आणि भौतिक संसाधनाचे संरक्षण होते आणि ते सामाजिक विकासास देखील समर्थ देते. जलद विकासाच्या हव्यासापायी नागतिक स्तरापासून ते अगदी गाव पातळीपर्यंत सर्व घटकांनी नैसर्गिक साधनसंपत्तीचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय केला. त्याचा परिणाम अन्न साखळीवर होवून संपूर्ण पर्यावरणीय असंतुलन निर्माण झाले. यात भावी पिढीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. इतर शिवाय वर्तमान कालीन सुध्दा स्वच्छ पिण्याचे पाणी, हवा प्रदुषण, जमिन प्रदूषण यासारखे प्रश्न निर्माण झाले. हे प्रश्न सोडविण्यासाठी हरित अर्थव्यवस्था आणि शाश्वत काळाची गरज आहे.

संदर्भग्रंथ :-

1. Khanfar, A.(2014), Environmental Economics, Green Economy, Assiul Journal, Environmental studies.
2. Bina, O. (2013) The green Economy and Sustainable development: an uneasy balance? Environment and planning C: Government and policy.
3. United, N. (2011) Towards a green economy: Pathways to Sustainable development and Poverty eradication. a reference for policymakers
4. Ministry of Environment Forest and climate change (MOEFCC) policy Documents
5. World Bank- Green Growth and sustainable Development.
6. Goverment of India- National Action plan on climate change (NAPCC)

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

7. UNEP (2013) Green Economy and Trade- Trends Challenges and opportunities.
8. UCTAD (2011) The Green Economy: Trade and Sustainable Development Implications, Nove.
9. Konstanczak S. (2014), Theory of sustainable Development and Social Practice problem of sustainable Development.
10. Jambhulkar, Vikas, Borkar, Ashok: Sustainable. Development Goals and Development of the Weaker Sections in India vol.X issue Dec. Jan 2017